महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
कस्तुरी इमारत, तळ मजला,
पेट्रोलियम हाऊस समोर, ज.द.मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दूरध्वनी क्रमांक:०२२- २२८८०१०६/१७ ईमेल : ao.transfer2024@mahakosh.in संकेतस्थळ:www.mahakosh.gov.in

वाचा :-
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१
३. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३,दि.११.०१.२००२
४. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३,दि.३१.०८.२००९
५. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३,दि.०१.०४.२०१०
६. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०१.०७.२०११
७. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३,दि.१९.०१.२०१३
८. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०९.१२.२०१६
९. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ दि.२३.१२.२०१५
१०. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.०८/सेवा-३ दि.११.०५.२०१७
११. शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.०२.०३.२०१९
१२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९
१३. वित्त विभाग पत्र क्र.वेतन १११९/प्र.क्र.३/सेवा-३ दि.०२.११.२०२०

---

क्र.संलेको २०२६/प्रशा-राप/सुसेआप्रयो/ 1177

दिनांक :- 01 SEP 2026

**विषय : तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करणेबाबत.**
**सहायक संचालक संवर्ग.**

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी / अधिकाऱ्यांना १०,२० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामधील नमुद तरतूदीनुसार, सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु.५४००/- या सुधारीतवेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी /अधिकाऱ्यांना लागु राहील. संबंधित कर्मचारी / अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

तथापि महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गातील जे अधिकारी सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० या वेतन स्तरामध्ये वेतन आहरित करतात, त्यांचे पुढील पदोन्नती साखळीतील पद उपसंचालक असून ते एस-२३ या वेतनस्तरामध्ये येते. याबाबत शासन वित्त विभागाने दि.०२.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये "सहायक संचालक" पदावरील अधिका-यास विद्यमान एस-२० या वेतनस्तरानंतर पदोन्नतीच्या साखळीत (In Promotional Hierarchy) एस-२३ या वेतनस्तरामध्ये उपसंचालक हे पद असल्याने, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्रता आजमावल्यानंतर, पात्र ठरत असल्यास, संबंधितास वेतनस्तर एस-२३ मध्ये अनुज्ञेय लाभ मंजूर करता येईल." अशी मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गात १० वर्षे नियमित सेवा झालेले श्री. शरद गंगाधर लोंढे यांना तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत उपसंचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ हा शासकीय सेवेतील पहिला लाभ म्हणून त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.६ मध्ये नमुद दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-यांचे नाव | सहायक संचालक संवर्गात प्रवेशाचा दिनांक | सहायक संचालक पदावर १० वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक | म.वि.व ले.से.वर्ग-१ परीक्षा दिनांक | तीन लाभांच्या योजनेंतर्गत उपसंचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. शरद गंगाधर लोंढे | ०२-०५-२०१६ | ०२-०५-२०२६ | भाग-१ मे-२०२२ उत्तीर्ण दि.०३-०८-२०२२ व भाग-२ एप्रिल-२०१४ उत्तीर्ण दि.२३-०५-२०१७ | ०२-०५-२०२६ |

अटी व शर्ती :

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.०८.०६.१९९५ मधील अट क्र.२ (मा) : या योजनेंतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेल्या लाभामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारी व कर्तव्यांमध्ये वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेतंर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतन निश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित/ कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील अट क्र.(xx) (३) : या योजनेतंर्गत पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार

नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात येईल.

३. शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील अट क्र.(xx) (२) : कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी/अधिकारी यास भविष्यात होणा-या/झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहित अटी व शर्तींच्या पुर्ततेनंतर, या योजनेंतर्गत यथास्थिती पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

४. या आदेशान्वये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक.पीएवाय-१०८२/सीआर/११००/(एक)/एसईआर-३, दिनांक ०६.११.१९८४ व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दि.२०.०२.२०१९ नुसार वेतननिश्चितीचा विकल्प द्यावयचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संबंधित कार्यालय प्रमुखांकडे सादर करावा.

५. संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेतील वेतननिश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करून त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून एस-२३ वेतनस्तरामध्ये देण्यांत यावा.

६. सदरचे आदेश संचालनालयाच्या https: mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालय प्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरावी.

(दीपा देशपांडे)
संचालक
लेखा व कोषागरे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :.
१. सहसचिव,वित्त विभाग,मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०३२
२. सहसंचालक लेखा व कोषागारे (सर्व)
३. आदेशातील नमूद लेखा अधिकारी यांचे विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
४ . संबधित अधिकारी यांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत.
५. संबधित अधिकारी यांची वैयक्तिक नस्ती.
६. निवड नस्ती.